# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८४ /२०२४ दि. ०२/१०/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०५/१०/२०२४ रोजी लाडकी बहीण योजनेच्या अनुषंगाने **मा. पंतप्रधान, भारत सरकार व मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांचा कासारवडवली घोडबंदर रोड ठाणे येथे दौरा आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमास महत्वाच्या व अति महत्वाच्या व्यक्ती तसेच मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. सदर कार्यक्रमाचे दरम्यान ठाणे ते घोडबंदर वाहिनी सर्व्हिस रोड, डीमार्ट ते टायटन हॉस्पिटल, घोडबंदर ठाणे वाहिनी सर्व्हिस रोड, ओवळा ते वाघबीळ नाका पर्यंत वाहने पार्क करण्यात मनाई व एक दिशा मार्ग करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

- **ठाणे घोडबंदर वाहिनी :–**

**प्रवेश बंद –** १) टायटन हॉस्पिटल कडून डीमार्ट कडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टायटन हॉस्पिटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टायटन हॉस्पिटल कडून डीमार्ट कडे जाण्यासाठी ओवळा सिग्नल येथून मुख्य रस्त्याने कासारवडवली, आनंदनगर, वाघबीळ ब्रिजखालून इच्छित स्थळी जातील.

- **घोडबंदर ठाणे वाहिनी :–**

**प्रवेश बंद –** १) वाघबीळ नाका कडून ओवळा कडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वाघबीळ नाका, सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने वाघबीळ नाका कडून आनंदनगर व कासारवडवली कडे जाण्यासाठी टीजेएसबी बॅक चौक, चिल्ड्रन ट्रॅफिक पार्क मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) सदर वाहने वाघबीळ नाका कडून ओवळा कडे जाण्यासाठी वाघबीळ ब्रिजखालून मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

**'नो पार्किंग झोन'** १) टायटन हॉस्पिटल ते डीमार्ट सर्व्हिस रोड **'नो पार्किंग झोन'** घोषित करण्यात येत आहे.
२) वाघबीळ नाका ते आनंदनगर नाका **'नो पार्किंग झोन'** घोषित करण्यात येत आहे

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०३/१०/२०२४ रोजी पासून कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner